आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

The New Miraj Education Society's

## Kanya Mahavidyalaya, Miraj

One Day National Multidisciplinary National Seminar

On

# Emerging Trends and Issues in Social Sciences

Saturday, 1st February, 2020

## *Organized by*

Department of Economics, Geography, History, Political Sciene, Psychology, Sociology and Physical Education & Sports

Editor

**Prof. Babasaheb Sargar**

Co-editor

**Prof. Ramesh Kattimani**

Volume II

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | निर्मला कारभारी वाघ | दारिद्रयता : एक समस्या | 83 |
| 20 | गायकवाड श्रीहरी रामराव<br>कृष्णाकांत नागनाथ कांबळे | लातूर जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादनाचे अभिक्षेत्रीय विश्लेषज | 86 |
| 21 | गायकवाड श्रीहरी रामराव | लातूर जिल्ह्यातील वाहतूक व दळणवळणाचा औद्योगिकीकरणावर होणारा परिणाम : एक भौगोलिक अभ्यास | 89 |
| 22 | धावणे डी.एस.<br>डॉ.ए.ए. काळगापुरे | बिदर जिल्ह्यातील रासायनिक खत केंद्रीकरण निर्देशांक : एक भौगोलिक अभ्यास | 92 |
| 23 | डॉ.राठोड रोहिदास शरद<br>डॉ.ज्योती पांचाळ | यवतमाळ जिल्ह्यातील कृषी यांत्रिकीकरणाच्या स्तरातील बदलाचा भौगोलिक अभ्यास | 94 |
| 24 | श्रीमती आर. व्ही. पाटील | शाश्वत शेती : आधुनिक काळाची गरज | 97 |
| 25 | प्रा. डॉ. दत्तात्रय शिंदे | भारतातील शेतीच्या समस्या : जत तालुक्यातील शेतीसमस्यांचा एक नमुना अभ्यास (जि.सांगली—महाराष्ट्र) | 100 |
| 26 | दिग्विजय दत्तात्रय कुंभार | राधानगरी धरणाचे कोल्हापूर जिल्ह्याच्या कृषी विकासातील योगदान | 104 |
| 27 | प्रा. श्रीमती. आर. एन. नाठे | व्यापारी भूगोलातील आधुनिक प्रवाह | 108 |
| 28 | प्रा.स्वामी रामेश्वर राजकुमार | नांदेड जिल्ह्यातील उच्च उत्पादन देणा-या कापूस पिकाच्या बियाणांचा अभ्यास | 111 |
| 29 | प्रा. वाघमारे व्ही .बी | भारतीय आर्थिक मंदी आणि उद्योग क्षेत्र सध्य स्थिती | 113 |
| 30 | डॉ. ढाले गौतम नामदेव | महाराष्ट्रातील ऐतिहासिक दृष्टिकोनातून किल्ल्यांचे संवर्धन | 117 |
| 31 | प्रा.यशवंत भालचंद्र खैरनार | चलेजाव चळवळीत नाशिक जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांचा सहभाग | 121 |
| 32 | क्रांतीसिंह मारूती देसाई | 14 .एप्रिल 1944 साली उडालेला गोदीतील धडाका | 125 |
| 33 | डॉ. अर्चना टाक | १८९७ चा शिवजयंती उत्सव व अहमदनगर एज्युकेशन सोसायटी | 127 |
| 34 | श्रीमती व्हसमने सुरेखा बसाप्पा | २१ व्या शतकातील स्त्रीवादी चळवळीच्या दिशा | 131 |
| 35 | प्रा.डॉ.किशोर मो. दुमणे | २१ व्या शतकातील स्त्रीवाद | 135 |
| 36 | डॉ.संगीता संपत पाटील | ३ सप्टेंबर १९४२ चा तासगांव चा ऐतिहासिक मोर्चा | 139 |
| 37 | प्रा. श्रीधर भाऊसाहेब शिंदे | वसतिगृहे : मागासवर्गियांच्या शिक्षणाची गरज | 143 |
| 38 | प्रा.डॉ. क्षीरसागर उर्मिला न. | कांतिसिंह नाना पाटील व स्वातंत्र्यलढा | 146 |
| 39 | प्रा. मनिषा श्रीणिककुमार पाटील | मुस्लिम सत्यशोधक समाज आणि हमिद दलवाई यांच्या विशेष संदर्भात | 149 |
| 40 | डॉ. निकम आर.डी. | भारतीय स्वातंत्र्य लढयातील यशवंतराव चव्हाणांचे योगदान | 153 |
| 41 | प्रा. डॉ. ज्ञानोबा तुकाराम कदम | भारतातील स्त्री सुधारणा चळवळ | 155 |
| 42 | डॉ.अविनाश दिगंबर फुलझेले | डॉ. आंबेडकर पूर्व विदर्भातील दलित चळवळ | 157 |




Affi No. 452
10

# राधानगरी धरणाचे कोल्हापूर जिल्ह्याच्या कृषी विकासातील योगदान

**दिग्विजय दत्तात्रय कुंभार**
विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ.
९५९५३६०१२५

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रामध्ये 'दक्षिण काशी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्याने आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. या जिल्ह्याला सहकार चळवळीची एक मोठी परंपरा लाभलेली आहे. त्यामुळेच महाराष्ट्रातील जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्नाचा विचार करता कोल्हापूर जिल्ह्याचा प्रथम क्रमांक लागतो. याचे संपूर्ण श्रेय जिल्ह्यातील कृषी विकासाकडे जाते.

कृषी विकासामध्ये जलसिंचनाने महत्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे.. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये छ. शाहू महाराजांनी या जलसिंचन प्रकल्पाचा पाया घालून कृषी क्रांती घडवली. त्यामुळेच स्वतंत्र्योत्तर कालखंडात जिल्ह्यात अनेक जलसिंचन प्रकल्प निर्माण होऊन हरितक्रांती घडून आली.

**राधानगरी तालुक्याचे भौगोलिक स्थान :**

राधानगरी तालुका कोल्हापूर जिल्ह्यात असून सह्याद्रीच्या रांगांमध्ये १६° १७° अक्षांश तर ७३° ७४° रेखांशावर वसलेला आहे. सदर तालुका महाराष्ट्र राज्याच्या पश्चिमेला तर कोल्हापूरच्या नैऋत्य दिशेला वसलेला आहे. या तालुक्याच्या पुर्वेला कागल तालुका, पश्चिमेस सिंधुदुर्ग जिल्हा व गगनबावडा तालुका, उत्तरेस पन्हाळा व करवीर तालुका तर दक्षिणेस फोंडा हा राज्यमार्ग क्रमांक १६ असून, कोल्हापूर पासून ५५ किलोमीटर अंतरावर वसले आहे.[१] तालुक्याची समुद्रसपाटीपासुनची सरासरी उंची ७०० मीटर आहे. प्रशासनाच्या सोयीकरिता जिल्ह्याचे करवीर, इचलकरंजी, गडहिंग्लज आणि राधानगरी असे चार उपविभाग केलेले आहेत. राधानगरी उपविभागामध्ये राधानगरी, भूदरगड व गगनबावडा हे तालुके समाविष्ट आहेत.[२]

**छत्रपती शाहू महाराजांचे कृषी विषयक योगदान :**

कोल्हापूर कृषी विकासाचे संपूर्ण श्रेय छ. शाहू महाराजांना जाते. शाहू महाराजांनी आपल्या कार्य कर्तुत्व आणि दूरदृष्टीने कृषीला विशेष प्रोत्साहन देऊन कृषी क्षेत्राचा विकास घडवून आणला. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी त्यांनी १९०२ मध्ये सार्वत्रिक पाटबंधारे धोरण ( Mass Irrigation Policy ) जाहीर केलं. त्यासाठी स्वतंत्र पाटबंधारे खात्याची निर्मिती करून त्यावर इरिगेशन ऑफिसरची नेमणूक केली. कृषीला पाणीपुरवठा करण्याची त्यांची सर्वात महत्वाची योजना म्हणजे त्यांनी बांधलेले राधानगरी धरण होय.[३]

**छत्रपती शाहू महाराज आणि राधानगरी धरणाची निर्मिती:**

इ. स.१८९५–९६ मध्ये कोल्हापूर राज्यात दुष्काळ पडला होता. छ. शाहू महाराजांनी दुष्काळ निवारण्यासाठी स्वतंत्र विभागाची स्थापना करून त्याठिकाणी छावण्या उभारल्या. तसेच दुष्काळापासून शेतकऱ्यांची कायमची सुटका करण्यासाठी जागतिक कीर्तीचे अभियंते श्री. विश्वेश्वरय्या यांना संस्थानचा पाहणी दौरा करण्यास सांगितले. श्री. विश्वेश्वरय्या यांनी संस्थानचा दौरा करून राधानगरी तालुक्यातील भोगावती व दूधगंगा नदीवरील जागांची निवड करून त्यासंबंधीचा अहवाल कोल्हापूर संस्थानला सादर केला. या अहवालात म्हटले होते, 'तुलनात्मक दृष्टीने पाहता दरबाराच्या हाती असलेली सांपत्तिक स्थिती अपुरी आहे.' तथापि विश्वेश्वरय्या अहवालाने न डगमगता महाराजांनी रावसाहेब विचारे ( तत्कालीन एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, करवीर संस्थान) व मि. मीटर यांना सर्व्हेसाठी नियुक्त केले. त्यांनी दूधगंगा व भोगावती नद्यांची पाहणी



Shahid Virpatni Laxmi Mahavidyalaya, Titave, Affi. No. 452

करून दोन जागांची निवड केली. त्यापैकी दूधगंगा नदीवरील प्रकल्प हा अतिमहत्त्वकांक्षी होता. त्यामुळे महाराजांनी खजिन्याची दुर्बलता पाहून हा प्रकल्प तूर्तास बाजूला ठेवला. तर दुसरा प्रकल्प म्हणजे भोगावती नदीवरील फेजिवडे जवळील धरण बांधण्याचा प्रकल्प हाती घेतला. या प्रकल्पाच्या सर्व्हेसाठी दोन हजार एकशे सत्तेचाळीस रुपये खर्च आल्याची नोंद आढळते.[४]

सदर प्रकल्प उभा करण्यासाठी भोगावती नदी आणि तिचा परिसर निवडण्याचे कारण म्हणजे या भागात वार्षिक सुमारे ५००० मी.मी. इतका पाऊस पडतो. हा प्रदेश मातीचा पातळ थर असलेल्या ट्रॅप जातीच्या खडकापासून बनलेला आहे. अतिवृष्टी होऊन जलसाठा वाहून गेल्यावर तेथील नद्याही उन्हाळ्यात कोरड्या पडत. पाणलोट क्षेत्रात लोकवस्ती विरळ असून प्रकल्पाची मुख्य जागा जलसाठ्याच्या दृष्टीने सुयोग्य होती. भोगावती नदी इतर नद्यांप्रमाणे कोरडी पडत असल्यामुळे पूर्वी तिच्याकाठी राहणारे खेडूत जलसाठ्यासाठी नदीला मातीचे लहान लहान बंधारे बांधत. परंतु त्यात पुरेसा जलसाठा न झाल्याने पिकांची हानी होत असे. याशिवाय हा प्रदेश डोंगराळ असल्यामुळे नदीकाठची जमीन ऊसाच्या पिकासाठी अत्यंत उपयुक्त असूनही तिचा पाण्याअभावी वापर होऊ शकत नव्हता. या सर्व गोष्टींचा अभ्यास करून शाहू महाराजांनी फेजिवडे गावाजवळची ही जागा धरणासाठी निवडली.[५]

या जागेवर ३६०० फूट लांबीचे आणि ११० फूट उंचीचे धरण बांधले जाणार होते. या धरणाचा खर्च केवळ ३० लाख रु. येणार होता. तर २० हजार हेक्टरहून अधिक जमीन ओलिताखाली येणार होती. तसेच या धरणामुळे बुडीत जाणार्या जमिनीचे प्रमाणही अल्प होते. महाराजांनी या धारण योजनेस हुकुम नं. ३९०/१९०८ दि. २२/०९/१९०८ रोजी मंजुरी दिली. तर धरणाच्या बांधकामास नोव्हेंबर १९०९ महाराणी लक्ष्मी तथा आईसाहेब यांच्या हस्ते सुरुवात केली.

राधानगरी धरणास राधानगरी हे नाव शाहू महाराजांच्या कन्या राधाबाई उर्फ आकासाहेब यांच्या नावावरून ठेवण्यात आले. त्यावेळी राधाबाई यांचा विवाह नुकताच संपन्न झाला होता. त्यांच्या स्मरणार्थ नियोजित धरणाजवळ राधानगरी हे गाव वसवले आणि धरणास राधानागी हे नाव दिले.[६] तसेच धरणाच्या तलावाला राणी लक्ष्मीबाई तलाव हे नाव शाहू महाराज यांच्या पत्नी राणी लक्ष्मीबाई यांच्या नावावरून देण्यात आले.[७]

धरणाचे बांधकाम यशस्वीरीत्या पूर्ण व्हावे म्हणून महाराज स्वतः धरण प्रकल्पाच्या साहित्य खरेदीसाठी मुंबईला गेले. तसेच या प्रकल्पामध्ये काही त्रूटी राहू नयेत म्हणून नोव्हेंबर १९०९ मध्ये नाशिकच्या प्रकल्पास भेट दिली. या प्रकल्पाची उभारणी होत असताना अनेक तज्ञ अभियंते आणि मुंबई सरकारचे गव्हर्नर इत्यादींनी भेटी दिल्या. मुंबई सरकारचे बांधकाम खात्याचे इंजिनिअर त्रि. ए. हिल ( सी. आय. ई.) यांनी पाया भक्कम असून चोख माल वापरून बांधकाम समाधानकारक होत आहे म्हणून आनंद व्यक्त केला होता.

महाराजांनी ८ मार्च १९०९ रोजी अबाजीराव ज्योतीराव मोहिते यांची स्पेशल डेप्युटी मामलेदार पदी नेमणूक केली. यांच्यावर या प्रकल्पात जाणाऱ्या जमीनी ताब्यात घेण्याचे व त्यांची नुकसानभरपाई संबंधित व्यक्तींना देण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यानुसार या प्रकल्पाच्या प्रस्ताव क्षेत्रात जाणाऱ्या सात गावांच्या विस्थापितांच्या भरपाईचा अंदाजे ππ हजार रुपये इतका खर्च करण्यात आला होता. तसेच प्रकल्पामध्ये जमिनी जाणाऱ्या शेतकऱ्यांना केळोशी, म्हासुर्ली, वाकिघोळ, तारळे, चंद्रे व तिटवे इ. ठिकाणच्या जमिनी देण्याचा निर्णय घेतला.[८] परंतु लोकांना आपल्या परंपरा व गाव सोडणे अडचणीचे होऊ लागल्याने त्यांनी धरण प्रकल्पाशेजारी असणाऱ्या जंगलातील मुलकी पडजमीन कसण्यास सुरुवात करून तेथे वसाहत स्थापन केली. महाराजांनी या प्रकल्पात बुडणाऱ्या गावांना रोख रक्कम देऊन पुनर्वसन कार्यास हातभार लावल्याचे दिसून येते. १६/०२/१९११ रोजी फेजिवडे येथील मुसलमानवाडी हा गाव पूर्णपणे या प्रकल्पात जात असल्याने तेथील घराच्या किंमतीबद्दल पंचनामा करून २५ घरांबद्दल भरपाई २३५९रु. १२ आणे देऊन सरकारात घेतली. यावरून महाराजांनी शेतकऱ्यांच्या बरोबरच विस्थापित होणाऱ्या लोकांचीही काळजी घेतल्याचे दिसून येते.


Shahid Virpatni Laxmi Mahavidyalaya Titave Affi. No. 452
12

सन १९१०–११ च्या अहवालानुसार त्यावर्षी २ लाख घनफुट बांधकाम झाले. तर वर्षाअखेर रु. ६८२९९ इतका खर्च झाला. त्यावेळी या प्रकल्पामध्ये तीन हजार कामगार कार्यरत होते. पुढे सन १९१८ मध्ये महायुद्ध व इतर कारणांमुळे राधानगरी धरण प्रकल्पाचे कामकाज थांबले. ते बांधकाम महाराजांच्या हयातीत पुन्हा सुरू झाले नाही. सन १९१८ मध्ये १२०० फूट लांब व ४० फूट उंच बांधकाम पूर्ण झाल्याचे नमूद आहे. त्यावेळी त्यात ६०० दशलक्ष घनफुट इतके पाणी साचले/साठले होते.

**तक्ता:**[१]

| वर्ष | वर्षातील बांधकाम ( घनफुट ) | एकूण बांधकाम ( घनफुट ) | वर्षातील खर्च (लाख रु.) | एकूण खर्च (लाख रु.) | कामगार संख्या ( हजारामध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १९११–१२ | ५२५७०० | ८६६४०० | १२९१७३ | — | ३१०० |
| १९१२–१३ | ४१०५७७ | १५४१६१२ | १४७०६७ | ४८६१०७ | ३१०० |
| १९१३–१४ | ९१२९७७ | २४५४५८९ | २०७९६८ | ६९४०७६ | ३१०० |
| १९१४–१५ | ७६१००० | ३२१५५८९ | १९९१६७ | ८९३२४३ | ३१०० |
| १९१५–१६ | ६००००० | ३८१५५८९ | २२५२१९ | १११८४६२ | — |
| १९१६–१७ | ५०९३०० | ४३२४९०० | १८३७०४ | १३०२१६६ | २०६० |
| १९१७–१८ | ६१२१८ | ४३८६०२८ | ३३९६४ | १३३६१३० | — |

**छ. राजाराम महाराजांचे कार्य :**

पहिल्या महायुद्धामुळे राधानगरी धरणाचे बांधकाम बंद पडले होते. शाहू महाराजांचे पुत्र राजाराम महाराजांनी ते काम पुन्हा सुरू करून धरण पूर्ण केले. पूर्ण झालेले धरण दगड चुनायुक्त असून धरणाची उंची १४० फूट इतकी आहे. या प्रकल्पास २कोटी ४ लाख ४४ हजार रु. खर्च आला. राधानगरी धरण प्रकल्पामुळे जी जमीन पाण्याखाली आली ती मुख्यत: ऊस व भाताच्या पिकाची आहे.

राधानगरी प्रकल्पामुळे करवीर, राधानगरी, हातकणंगले, शिरोळ, पन्हाळा या तालुक्यातील प्रत्यक्ष भिजणाऱ्या गावांची संख्या १३३ आहे. भोगावती नदीवर तारळे, शिरगाव, राशिवडे, हळदी, कोंगे खडक आणि पंचगंगा नदीवर राजाराम, सुर्वे, रुई, इचलकरंजी, तेरवाड, शिरोळ, रुकडी असे कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आहेत.[११]

**राधानगरी धरणामुळे निर्माण झालेले तालुकानिहाय सिंचन क्षेत्र.** [२]

| अ. क्र | तालुका | सिंचन क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| १. | राधानगरी | ४०३५ |
| २. | करवीर | १०९४० |
| ३. | हातकणंगले | ७१८५ |
| ४. | शिरोळ | ३४१५ |
| ५. | पन्हाळा | ९८५ |
| | **एकूण** | **२६५६०** |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, राधानगरी धरणामुळे जिल्ह्यातील राधानगरी, करवीर, हातकणंगले, शिरोळ आणि पन्हाळा आशा पाच तालुक्यातील २६५६० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. यामध्ये सर्वाधिक क्षेत्र करवीर तालुक्यामध्ये १०९४० हेक्टर इतके आहे. त्यानंतर अनुक्रमे हातकणंगले ७१८५ हेक्टर, राधानगरी ४०३५ हेक्टर, शिरोळ ३४१५ हेक्टर



Shahid Virpatni Laxmi Mahavidyalaya Affi No. 452 Titave

13

आणि पन्हाळा ९८५ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. यावरून राधानगरी धरणाचा सर्वाधिक लाभ करवीर तालुक्याला तर सर्वात कमी लाभ पन्हाळा तालुक्याला झालेला दिसून येतो.

**निष्कर्ष:**

१. राधानगरी धरणामुळे जिल्ह्याचा आर्थिक विकास घडून आला आहे.

२. राधानगरी प्रकल्पामुळे शेतकरी आपल्या शेतामध्ये वेगवेगळी पिके घेऊ लागले आहेत. यामध्ये प्रामुख्याने ऊस आणि भाताचे क्षेत्र अधिक असल्याचे दिसून येते.

३. हा प्रकल्प राधानगरी तालुक्यात असला तरी त्याचा सर्वाधिक लाभ करवीर तालुक्याला झाल्याचे समजते.

अशा पद्धतीचे अनुकूल परिणाम या प्रकल्पामुळे झाले असले तरी, काही प्रतिकूल परिणामही दुर्लक्षित करता येत नाहीत. त्यामध्ये,

१. प्रकल्पामध्ये गेलेल्या आठ गावांचे शाहू महाराजांनी पुनर्वसन केले असले तरी सदर गावातील लोकांना आपली मूळची गावे आणि प्रथा परंपरा सोडाव्या लागल्या आहेत.

२. पुनर्वसन केलेल्या लोकांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न अजूनही सुटलेला दिसत नाही.

एकंदरीत विचार करता राधानगरी या शाहू महाराजांनी निर्माण केलेल्या प्रकल्पामुळे जिल्ह्याला आर्थिक सुबत्ता आलेली आहे.

**संदर्भ :**

१. पाडळकर वि. वि. — स्वातंत्र्योत्तर कालखंडातील राधानगरी तालुक्याचा राजकीय, आर्थिक व सामाजिक अभ्यास पी. एच डी. प्रबंध ( अप्रकाशित ) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. पृ. २३५

२. जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन कोल्हापूर जिल्हा २००६—०७. पृ. ५६

३. पवार जयसिंगराव ( संपादक ), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ प्रकाशक डॉ. जयसिंगराव पवार संचालक महामंडळ, इतिहास प्रबोधिनी १०८, साने गुरुजी वसाहत, राधानगरी रोड, कोल्हापूर. पृ. २०२

४. पाडळकर विष्णू विजय— उपरोक्त पृ. २८

५. चौधरी कि. का.— महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, कोल्हापूर जिल्हा दर्शन विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई १९८९. पृ. २१५

**************

Shahid Virpatni Laxmi Mahavidyalaya
Affi No. 452
Titave